दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
Polycab | Raccold | legrand | HAVELLS | L&T SWITCHGEAR | INDOASIAN
Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २३५ वा बुधवार दि.२१ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण विधेयक दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर

मुंबई : राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण विधेयक आज विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. मराठा समाजासाठी दहा टक्के आरक्षणासाठी घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक, धाडसी आणि कायद्याच्या कसोटीवर टिकणारा असल्याचे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने संमत केल्याबद्दल सर्व सदस्यांचे आभार मानले.ओबीसी अथवा इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला असून मराठा समाजाला आरक्षण देण्याची शपथ घेतल्यानंतर शासनाने तीन महिन्यात आरक्षणाचा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. मराठा समाज बांधवांनी केलेल्या आंदोलनाबाबत उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले, लाखो मराठा बांधवांनी आपल्या हक्कांसाठी लढा देताना आजवर संयम सोडलेला नाही. शिस्त मोडली नाही. याबद्दल मी संपूर्ण मराठा समाजाचे, तरुण-तरुणींचे आभार व्यक्त करतो. आजचा निर्णय हा मराठा समाजाचा, मराठा ऐक्याचा विजय आहे आणि हा चिकाटीने दिलेल्या लढ्याचा विजय आहे. मी एका सर्वसामान्य मराठा शेतक-याचा मुलगा आहे. समाजाच्या वेदना, दु:खाची मला जाणीव आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर हे दु:ख, वेदना कमी करण्यासाठी अनेक आघाड्यांवर सकारात्मक प्रयत्न केले, करत असल्याचे त्यांनी सांगितले. समाजबांधवांनी शासनावर विश्वास ठेवावा, कुठलाही दूजाभाव ठेवला जाणार नाही, असे सांगून आंदोलनकर्त्यांनी आंदोलन मागे घेण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, एकेकाळी प्रगत असलेला मराठा समाज आता काळाच्या ओघात मागे पडला आहे. शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्याही तो मागे लोटला जात आहे. त्यामुळे या समाजाच मागासलेपण दूर करण्यासाठी आरक्षण मिळवून देणे हा पर्याय होता. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आरक्षण मिळवून द्यायचा निर्धार शासनाने केला होता. नागपूर येथे विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दोन्ही सभागृहाच्या सर्व सदस्यांनी मराठा समाजाला आरक्षणाची कशी गरज आहे हे तीन दिवसाच्या चर्चेत मांडले होते. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सभागृहाची मराठा आरक्षणास संमती मिळाल्याने फेब्रुवारी २०२४ मध्ये विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवून या विषयावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात येईल, हे मी जाहीर केले होते. त्यानुसार आजचा दिवस अमृत पहाट घेऊन आला आहे. माझ्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि संपूर्ण मंत्रिमंडळ गेले १५० दिवस अहोरात्र मेहनत घेत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले.कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का नाही ओबीसीकिंवा अन्य कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि टिकणारे आरक्षण मिळायला पाहिजे, हीच आमची भावना असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. मागील पावणेदोन वर्षांपूर्वी सत्ता हाती घेतलेल्या महायुती सरकारने ठरवल्यानुसार आज मराठा समाजाला आरक्षण जाहीर करत असल्याचे सांगून मुख्यमंत्री झाल्यावर मराठा समाजासाठी ठोस करून दाखविण्याची संधी मिळाली. हे मी माझे अहोभाग्य समजतो, असे ते म्हणाले. स्व.अण्णासाहेब पाटील यांनी दिलेले बलिदान आमच्या सरकारने व्यर्थ जाऊ दिले नाही, असेही त्यांनी सांगितले. मराठा समाजाला आरक्षण मिळायला पाहिजे आणि मुख्यमंत्री म्हणून पहिल्या दिवसापासूनच ही इच्छा मी व्यक्त केलेली आहे. राज्य शासन पूर्णपणे मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या बाजूने आहे. फक्त कायदेशीर मार्गाने त्यातल्या अडचणी दूर करायच्या होत्या. त्या अडचणी दूर करून दिलेला शब्द पूर्ण करतोय असे मुख्यमंत्री शिंदे यांनी अभिमानाने सांगितले.सर्वोच्च न्यायालयाच्या निष्कर्षांवरून कार्यवाही मुख्यमंत्री म्हणाले, आमचे युतीचे सरकार आल्यावर मराठा आरक्षण हे शासनाचे प्राधान्य होते. यासाठीच सप्टेंबर २०२२ मध्ये मंत्री चंद्रकांत पाटील यांना उपसमितीचे अध्यक्ष केले. सत्तेवर आल्यानंतर लगेचच म्हणजे ऑगस्ट २०२२ मध्ये अधिसंख्य पदांची निर्मिती केली. तसा कायदा केला. २१ सप्टेंबर २०२२ रोजी शासन निर्णय काढून त्याची अमलबजावणी देखील सुरू केली. २०१४ ते २०२२ - २३ या कालावधीतील रखडलेली नोकरभरती आम्ही पूर्ण केली. जे निष्कर्ष नोंदविले होते त्यावर आम्ही पूर्ण लक्ष्य केंद्रित केले. सर्वोच्च न्यायालयात क्युरेटिव्ह पिटीशनवर आता सुनावणी सुरु झाली आहे. त्यात देखील राज्य सरकारच्या बाजूने भक्कमपणे बाजू मांडण्यात येत आहे. तेथे निश्चित यश मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मराठा आरक्षणाच्या बाजूने युक्तिवाद करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने विधीज्ञांची फौज उभी करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाची बाजू सक्षमपणे मांडणा-या विधीज्ञांचीही या कामी मदत घेतली जात आहे. कार्य दल देखील स्थापन केला असल्याचे ते म्हणाले. युद्धपातळीवर सर्वेक्षण मुख्यमंत्री म्हणाले, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय आणि इतर न्यायालयीन पातळीवरही मराठा समाजाचे आरक्षण कसे टिकून राहील याबाबत शासन आणि आयोगात समन्वय राखण्यासाठी निवृत्त न्या. दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीवर चर्चा करण्यासाठी तसेच मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमिती, मुख्य सचिव तसेच मा. मुख्य न्यायाधीश दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील सल्लागार मंडळाच्या सुमारे ५० बैठका झाल्याचे त्यांनी सांगितले. मराठा समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासणी करण्यासाठी १३ नोव्हेंबर २०२३ रोजी राज्य मागासवर्ग आयोगाला संदर्भ अटी निश्चित करुन देण्यात आल्या. तसेच राज्य मागासवर्ग आयोगास तातडीने ३६७ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. नमुना सर्वेक्षण न करता सर्वोच्च न्यायालयाने ट्रिपल टेस्टमध्ये सांगितल्याप्रमाणे विस्तृत सर्वेक्षण (इम्पेरीकल डेटा) गोळा करण्याचे शिवधनुष्य उचलायचे होते. यासाठी तीन ते साडेतीन लाख प्रगणक नेमण्यात आले. त्यांचे मास्टर्स ट्रेनिंग झाले. २३ जानेवारीपासून युद्धपातळीवर सर्वेक्षण सुरु झाले. हे सर्वेक्षण अचूक तर करायचे होतेच पण वेळेत पूर्ण करायचे होते. २ फेब्रुवारी २०२४ म्हणजे नऊ दिवसांत सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले. सुरुवातीच्या काही तांत्रिक अडचणी दूर केल्या गेल्या. हे काम निश्चितच जबाबदारीचे आणि आव्हानात्मक होते, एखाद्या समाजाला न्याय देण्याचे काम होते. १६ फेब्रुवारी रोजी न्या. सुनील शुक्रे यांनी हा अहवाल शासनाला सुपूर्द केला, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.शक्ती पणाला लावणार सुप्रीम कोर्टाने आरक्षण रद्द करताना ज्या त्रुटी निदर्शनात आणून दिल्या त्या दूर करण्याच्या प्रयत्नावर भर दिला जात आहे. आम्ही अत्यंत वेगाने ताकदीने काम करुन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करीत आहोत अशा पद्धतीने टप्प्याटप्प्याने मराठा समाजाचे आरक्षण कायद्याच्या चौकटीत बसण्यासाठी सरकार प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. मराठा समाजाला टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण मिळवून देण्यासाठी शासनाने मोठे पाऊल उचलले आहे. आता ते टिकून राहावे म्हणून राज्य सरकार आपली सर्व शक्ती पणाला लावणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. आजच्या निर्णयामध्ये प्रशासनातील विशेषत: सामान्य प्रशासन विभाग, राज्य मागासवर्ग आयोग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महसूल विभाग, विधी व न्याय विभाग तसेच वित्त विभागातील आणि गृह विभागातील अधिका-यांपासून ते अगदी शेवटच्या चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांनी घेतलेली अपार मेहनत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे, मागासवर्ग आयोगाचे सर्व सदस्य, गोखले इन्स्टिट्यूट आणि ज्यांनी हा गोवर्धन पर्वत उचलला ते सर्व प्रगणक, महसूल यंत्रणा, अगदी थेट सरपंच, तलाठी यांच्यापर्यंत सर्वांचे मुख्यमंत्री शिंदे यांनी आभार मानले.

मराठा समाजाच्या हिताचा विषय असल्यामुळेच विरोधी पक्षाकडून आरक्षण विधेयकाला पाठिंबा

मुंबई (प्रतिनिधी): मराठा समाजाला शैक्षणिक आणि शासकीय नोकऱ्यात १० टक्के आरक्षण देण्यासंदर्भातील विधेयक आज महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर झाला आहे ही आनंदाची बाब आहे, मात्र हे विधेयक मांडण्यापूर्वी सरकारने विरोधी पक्ष आणि मराठा समाजाला विश्वासात घेतलेले नाही, त्यामुळे समाजाची फसवणूक झाल्यास सरकारला ते कदापिही परवडणार नाही याची जाणीव सरकारने ठेवणे आवश्यक आहे अशी प्रतिक्रिया माजी मंत्री, आमदार विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या निर्णयाच्या संदर्भाने प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले आहे की, मराठा समाजाला समाजाला न्याय देण्याचा विषय असल्यामुळे सर्व विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आरक्षणासंदर्भातील विधेयकाला विधिमंडळात पाठिंबा दिला आहे, असे असले तरी आघाडी सरकारच्या काळात मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय झाला होता नंतर युती सरकारने ते आरक्षण १३ टक्केवर आणले, आता त्याच मंडळींनी पुन्हा ते आरक्षण १० टक्क्यावर खाली आणले आहे, आजचे विशेष अधिवेशन बोलावंतांना सरकारने विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठकही घेतली नाही, शिवाय सरकारने विरोधी पक्ष आणि मराठा समाजालाही विश्वासात घेतलेले नाही, त्यामुळे समाजाला नेमके काय हवे आहे, मराठा समाजाचे नेते श्री मनोज जरंगे पाटील यांनी चालवलेले आंदोलन कोणत्या मागणीसाठी आहे, आणि मुंबईतील मोर्च्याच्यावेळी शासनाने त्यांना दिलेली आश्वासने यापैकी कोणत्याच गोष्टीचा सरकारने आज विचार केलेला दिसत नाही, आज दिलेले १० टक्के आरक्षण कायद्याच्या चौकटीत आहे का? ते न्यायालयात कसे टिकणार आहे? यावरही सभागृहात चर्चा होऊ दिली नाही किंवा सरकारने त्यासंबंधी स्पष्टीकरणही दिलेले नाही, त्यामुळे निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शासनाने घाहीगडबडीत हा निर्णय घेतला असल्याची शंका उपस्थित होत आहेत, या परिस्थितीत समाजाची फसवणूक झाली तर ते परवडणारे ठरणार नाही याची जाणीव सरकारने ठेवणे आवश्यक आहे असे आमदार अमित देशमुख यांनी शेवटी म्हटले आहे.

लातूर शहरातील कापड मिल परिसरातील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर लोर्कापण प्रसंगी..महाराष्ट्र राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री व जिल्हा पालकमंत्री मा संभाजी भैय्या पाटील निलंगेकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी श्री विनोदशेठ ऊर्फ शिवप्रसाद मालू, सौ. शितलताई मालू नगरसेविका,चेअरमन मा.श्री दगडूजी साळुंके, श्री तोरंबेसाहेब , मा.मंत्रीजी, युवा नेते संतोषजी ठाकुर , संजयकुमार सूरवसे श.जि.चिटणीस आदिसह..

संपादकीय....

लेह-लडाखही लटकले?

जम्मू-काश्मीरचे '३७०' कवच काढून घेताना केंद्र सरकारने लडाखला ना राज्यनिर्मितीचे आश्वासन दिले, ना इथल्या जमातींना संरक्षण दिले राजधानी दिल्लीत शेतकरी आंदोलन, भाजपचे पुढील हजार वर्षांच्या रामराज्याचा एल्गार करणारे अधिवेशन इत्यादींच्या धबडग्यात सोमवारी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत काय झाले याचा पूर्ण तपशील अद्याप उपलब्ध नाही. तसा तो नसला तरी ज्या विषयावर ही बैठक केंद्रास बोलवावी लागली तो मुद्दा महत्त्वाचा आहे. याचे कारण गेले काही महिने त्या भागात जे काही सुरू आहे त्याकडे जवळपास संपूर्ण देशाचे दुर्लक्ष झालेले आहे. देशाच्या सीमावर्ती भागांतील खदखदीकडे सतत काणाडोळा करणे हे तसे आपले वैशिष्ट्यच. मग तो प्रदेश म्यानमारच्या सीमेवरील मणिपूर असो वा चीनशी भौगोलिक साहचर्य असणारे लेह-लडाख असो. या परिसरांतील अस्वस्थतेची दखल मध्यवर्ती माध्यमे पुरेशा प्रमाणात घेत नाहीत आणि त्यामुळे या परिसरांतील अस्थैर्याचे वास्तव नागरिकांस उमजू शकत नाही. लेह- लडाख- कारगिल भागांबाबत हे सत्य पुरेपूर लागू पडते. गेले काही आठवडे त्या परिसरांत रहिवाशांचे लाखा-लाखांचे मोर्चे निघाले. त्यास ना वाहिन्यांनी प्रसिद्धी दिली ना महत्त्वाच्या वर्तमानपत्रांच्या प्रथम पृष्ठांवर त्यास स्थान मिळाले. या मोर्चेकऱ्यांच्या प्रमुख मागण्या अत्यंत साध्या म्हणाव्यात अशा आहेत. लेह- लडाख- कारगिल या परिसरास स्वतंत्र राज्याचा दर्जा हवा, तो लगेच देता येत नसेल तर केंद्रशासित प्रदेशात स्वत:ची प्रतिनिधीसभा हवी आणि तूर्त या प्रदेशातून फक्त एकच लोकप्रतिनिधी संसदेत जातो; त्यात आणखी एकाची भर हवी. या मागण्यांस त्या प्रांतातील नागरिकांचा इतका व्यापक पाठिंबा आहे की एरवी अशा विषयांकडे आणि प्रदेशांकडे दुर्लक्ष करणाऱ्या केंद्र सरकारलाही या आंदोलनांची दखल घ्यावी लागली. ताजी बैठक ही त्यासाठीच. तिचे महत्त्व यापेक्षाही अधिक आहे. याचे कारण या परिसरातील १४ संघटना, पक्ष इत्यादींचे संयुक्त कृती दल सदर मागणीच्या पाठपुराव्यासाठी स्थापन करण्यात आले असून त्यात सर्वपक्षीय- भाजपसह- सदस्यांचा समावेश आहे. आंदोलकांचा हा आक्रोश आजचा नाही. तर जम्मू-काश्मीर परिसरास लागू असलेले अनुच्छेद ३७० रद्द केल्यापासूनचा आहे. वास्तविक त्या घटनेचे लेह-लडाख परिसराने स्वागत केले. कारण वांशिक, सांस्कृतिक आणि धार्मिकदृष्ट्याही स्वतंत्र असलेल्या या प्रदेशाचे भागधेय जम्मू-काश्मीरशी बांधणे अयोग्य होते. ती चूक २०१९ च्या ऑगस्ट महिन्यात दूर झाली. ते ठीक. पण त्यानंतर लेह- लडाख- कारगिल प्रदेशास जे देणे केंद्राने अपेक्षित होते तेही नाकारले जाते. म्हणजे राजकीय अस्थैर्य म्हणून जम्मू-काश्मिरात निवडणुका नाहीत आणि राजकीय स्थैर्य असूनही लेह- लडाख- कारगिलातही निवडणुका नाहीत, हे कसे? केंद्र जम्मू-काश्मीरप्रमाणे आपल्यालाही वाटाण्याच्या अक्षता लावते आहे हे लक्षात आल्यावर या प्रदेशातील अस्वस्थता वर येऊ लागली. त्यामुळेच जम्मू-काश्मीरच्या जोखडातून सुटल्याचा या प्रदेशाचा सुरुवातीचा उत्साह २०२१ पासून मावळू लागला आणि स्थानिकांची खदखद व्यक्त होऊ लागली. ती फक्त राज्याचा दर्जा नाही, प्रतिनिधीसभा नाही इतक्यापुरतीच नाही. त्यापेक्षा किती तरी व्यापक आयाम या नाराजीस आहे. उदाहरणार्थ रोजगारनिर्मिती, गुंतवणूक, आर्थिक स्वायत्तता, स्थानिकांचा संपत्तीचा विशेषाधिकार अशा एकाही मुद्द्यावर केंद्राने या प्रदेशास दिलेले आश्वासन अद्याप पाळलेले नाही. हळूहळू स्थानिकांच्या तीव्र भावना व्यक्त होऊ लागल्या. ठिकठिकाणी मोर्चे निघाले, उपोषणे झाली. पण केंद्र मात्र ढिम्म. अखेर गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात केंद्राने या संदर्भात पहिल्यांदा लेह- लडाख- कारगिलवासीयांचे म्हणणे ऐकून घेतले. त्या बैठकीत लेह- लडाख- कारगिलवासीयांच्या सर्वपक्षीय समितीने आपले म्हणणे केंद्रास लेखी सादर केले. पण नंतर प्रतिसाद शून्य. अखेर ३ फेब्रुवारी रोजी लेह- लडाख- कारगिल बंद पाळला जाईल असे जाहीर झाल्यानंतर केंद्रास पुन्हा जाग आली आणि २ फेब्रुवारी रोजी चर्चेच्या पुढच्या फेरीचे आश्वासन दिले गेले. ही चर्चा १९ फेब्रुवारीस ठरली. तथापि केंद्राच्या आश्वासनांचा एव्हाना पुरेपूर अनुभव आलेल्या लेह- लडाख- कारगिलवासीयांनी ३ फेब्रुवारीचा नियोजित बंद कडकडीतपणे आणि उत्स्फूर्तपणे पाळला.ही पार्श्वभूमी लक्षात घेतल्यानंतर त्यांच्या मागण्यांविषयी. यातील अत्यंत महत्त्वाची मागणी आहे ती राज्यघटनेच्या 'सहाव्या परिशिष्टा'तील समावेशाविषयी. हा प्रदेश ऑगस्ट २०१९ पर्यंत जम्मू-काश्मीरचा भाग होता आणि त्यामुळे त्या प्रांतांच्या विशेष दर्जाचा लाभ या परिसरासही मिळत होता. पण जम्मू-काश्मीरसाठीचे 'अनुच्छेद ३७०' रद्द झाले आणि या प्रांतानेही आपला विशेषाधिकार गमावला. याचबरोबर या भागातील नागरिकांचा स्थावर मालमत्तेवरील विशेष मालकी हक्कही गेला आणि स्थानिक रोजगारावरील दावाही त्यांनी गमावला. या बदल्यात मिळाले काय? तर काही नाही. जम्मू-काश्मीरने '३७०' संरक्षण गमावल्यानंतर पुढच्याच महिन्यात सप्टेंबर २०१९ मध्ये 'राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगा'ने लडाखच्या केंद्रशासकीय प्रदेशाचा समावेश 'सहाव्या परिशिष्टा'त करण्याची शिफारस केली. यात समावेश झाल्यास स्थावर मालमत्तेचा आणि स्वायत्ततेचा हक्क घटनेनुसार दिला जातो. ही बाब स्थानिकांसाठी अत्यंत महत्त्वाची. कारण एकट्या लडाख प्रदेशात ९७ टक्के नागरिक हे 'अनुसूचित जमाती'त मोडतात. या वास्तवाकडेही केंद्राने दुर्लक्ष केले आणि स्थानिकांचा रोष ओढवून घेतला.तो व्यक्त करणाऱ्यांत भाजपचेही नेते आहेत ही बाब सूचक. ते या सर्वपक्षीय समितीत अग्रभागी असून बौद्ध धर्मीय लेह-लडाखला मुसलमान धर्मीय कारगिलसमवेत बांधणे या सर्वांस मंजूर नाही. त्यामुळे कारगिलसाठी स्वतंत्र लोकसभा मतदारसंघ असावा अशीही त्यांची मागणी आहे. ती अर्थातच लगेच मान्य होणे अशक्य. पण आज ना उद्या त्याची दखल घ्यावीच लागेल. पुरेशा विचाराअभावी केलेल्या कृतीमुळे काय काय घडते याचे दर्शन या सर्वांतून होते. जम्मू-काश्मीरचा विशेषाधिकार काढून टाकण्याच्या उत्साहात लेह- लडाख- कारगिलच्या तिढ्याकडे केंद्राने लक्ष दिले नाही, असा आरोप झाल्यास ते गैर नाही. पूर्वीच्या अवस्थेत या प्रदेशातून चार का असेना पण आमदार जम्मू-काश्मीर विधानसभेत धाडले जात आणि त्याद्वारे स्थानिकांस विकास प्रक्रियेत सहभागी होता येत असे. परंतु २०१९ च्या ऑगस्टपासून हे सारेच खुंटले आणि दूरवर श्रीनगर वा जम्मूत बसून राज्य हाकणाऱ्या राज्यपालाच्या हाती या प्रदेशाची सूत्रे दिली गेली. लेह- लडाख- कारगिलसाठी म्हणून केंद्राकडून तब्बल ६ हजार कोटी रुपयांचा निधी दिला जातो. सद्य:स्थितीत त्यावर एकाचेच नियंत्रण आहे. ते म्हणजे राज्यपाल. या निधीच्या विनियोगाबाबत ना स्थानिकांस काही विचारले जाते ना राज्यपाल त्याचे काय करतात हे स्थानिकांस सांगितले जाते. परत राज्यपाल/ राष्ट्रपती यांनी केलेल्या खर्चावर काही प्रश्न विचारण्यासही मनाई! या दोघांच्या खर्चाचा हिशेब संसदेतही मागता येत नाही.अशा तऱ्हेने लेह- लडाख- कारगिल प्रांतातील नागरिकांस 'होते ते बरे होते' असे वाटू लागले असल्यास आश्चर्य नाही.

३९४ वी शिवजयंती कोणी कोणी साजरी केली.

भारत हा विविध जातीधर्माच्या लोक समूहाचा देश आहे,प्रत्येकाची जात,धर्म,भाषा वेशभूषा वेगवेगळी असली तरी सर्वांना स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि समान न्याय मिळत असतो.ज्यांना भारतीय राज्य घटना संविधान मान्य नाही ते वेळोवेळी मनुस्मृती नुसार आचरण करून देशाच्या सार्वभौम धर्मनिरपेक्षतेलाचा आव्हान देण्यासाठी उभे राहत होते.यांचे उत्तम उदाहरण म्हणजेच तिथी नुसार शिवजयंती व सत्यनारायण महापूजा आहे.आता काल पर्यत तिथी नुसार शिवजयंती साजरी करणारी शिवसेना लोकशाही मार्गाने सत्ताधारी झाली होती.त्यामुळेच त्यांच्या शिवसैनिकासाठी शिवजयंती मोठे धर्म संकट झाले होते आणि आज ही आहे.

कायदा सुव्यवस्था बिघडविणे समाजात तेढ निर्माण होईल असा कार्यक्रमाचे आयोजन करणे म्हणजे कलम १४२ ते १५२ नुसार गुन्हा आहे.पण मुंबईसह महाराष्ट्रातील पोलीस प्रशासन या घटनाकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत आली आहे.ती धर्मनिरपेक्ष,निःपक्षपाती निर्भीड पणे कायद्याची अंमलबजावणी करीत नाही हे यावरून सिद्ध होत होते. शिवजयंती साजरी करणारी मंडळी छत्रपती शिवाजी महाराज यांचा कोणत्याही आदर्श डोळ्यासमोर ठेवून तिथी नुसार जयंती साजरी करत नाही.म्हणूनच तिथी नुसार शिवजयंती म्हणजे गोब्राह्मण प्रतिपालक हे मराठा ओबीसी मागासवर्गीय समाजाच्या मनावर अधिराज्य गाजविण्यासाठी साजरी केली जाते व सत्यनारायण महापूजा घातली जाते.

शिवाजी महाराजाच्या नांवाचा व्यापार करून काही संघटना राज्यात सत्ताधारी झाल्या पण त्यांनी शिवाजी महाराजांचा खरा आदर्श कधीच घेतला नाही,केवळ नांवा पुरती प्रतिमा आणि मूर्तीचा वापर केला.शिवाजी महाराजांच्या मातोश्री राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या चरित्रावर शिंतोडे उडवण्याचे काम ज्यांनी केले त्यांच्या समर्थनात आपली शक्ती खर्च केली. त्याचं पद्धतीने शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा वाद बुद्धिजीवी विचारवंत्यांच्या समितीने सोडविल्या वर ही आपली भूमिका त्यांनी सोडली नाही. त्यामुळे राज्यात शिवरायांचे मावळे कमी आणि कावळे जास्त झाले.म्हणून जयंती बाबत ही समाजात गैरसमज कसे निर्माण होतील यांची जास्त काळजी त्यांनी घेतली.आता पूर्वीची,आजची शिवसेना आणि शिवजयंती त्यांचे शिवसैनिक कशी साजरी करणार?. वैचारिक वारसा सांगणार की मनुवादी विचार हे खूप महत्वाचे ठरणार आहे.

राज्यात शाळा,कॉलेजात विद्यार्थीदसे पासूनच त्यांना अभ्यासक्रमात एक आणि बाहेरच्या जगात एक शिवाजी महाराज शिकविला जातो,त्यामुळेच जय शिवाजी,जय भवानी ह्या घोषणा डोक्यात फिट बसल्या आहेत. त्या कशासाठी दिल्या जातात ते ठळकपणे दिसते. त्यांना कोणता शिवाजी अभिप्रेत आहे हे दरवर्षी ते कायद्याला आव्हान देऊन दाखवून देतात. परंतु आता पूर्वीची,आजची शिवसेना आणि शिवजयंती शिवसैनिकासमोर धर्म संकट आहे.

राष्ट्रपिता जोतीराव फुले यांनी १८६९ साली रायगडावरील शिवरायांची समाधी शोधून काढली व शिवरायांच्या जीवनावर जगातील पहिला आणि प्रदिर्घ असा खरा पोवाडा लिहिला. शिवरायांचे जगविख्यात कार्य घराघरात पोहचावे यासाठी जोतीराव फुले यांनी १८७० साली शिवजयंती सुरु केली. शिवजयंतीचा पहिला कार्यक्रम पुणे येथे पार पडला. तेंव्हा पासून शिवजयंती मोठ्या धुमधडाक्यात सुरु झाली. याप्रसंगी टिळक १२-१३ वर्षाचे 'बाळ' होते. शिवजयंतीचा वाढता लोकोत्सव पेशवाईच्या समर्थकांना खुपत होता. कारण पेशव्यांनी शिवशक बंद करुन मुस्लिमांचा फसली शक सुरु केला होता.म्हणून ही तिथी नुसार शिवजयंती सन्मान आहे की अपमान?. हे काही मराठ्यांना ओबीसीनां आज ही कळत नाही. ते मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडच्या प्रबोधना पासुन अजूनही सुरक्षित अंतरावर मानसिक गुलाम म्हणून उभे आहेत.एक मराठा लाख मराठा म्हणणारे आजही मनुवादी मानसिकता असलेले वैचारिक गुलाम आहेत. कालची १९ फेब्रुवारी २०२४ ची ३९४ वी शिवजयंती कोणी कोणी साजरी केली. त्याचा स्मार्ट मोबाईलने शोध घ्यावा. इतिहास सांगतो शिवरायांचा रायगड उध्वस्त करुन दप्तरखाना जाळला होता. त्याला पेशवाईचे समर्थन होते. म्हणुन ब्राह्मणांचे जेष्ठपुढारी बाळ गंगाधर टिळक यांनी शिवजयंती बंद पाडण्यासाठी गणेशोत्सव सुरु करुन शिवभक्तात शिवजयंती बाबत संभ्रम निर्माण केला.आणि करणारे टिळक हे आद्य ब्राह्मण होते.पुढे ब्राह्मणांनी शिवजयंती निश्चित होऊ नये यासाठी 'वाद' कायम ठेवला. कारण शिवजयंतीच्या निमित्ताने प्रजा एकत्र येईल. ख-या शिवचरीत्रातून हक्क-अधिकाराची मागणी करणारे शिवभक्त मावळे निर्माण होतील, हे

रोखण्यासाठी ब्राह्मणांनी शिवजयंतीचा वाद चालू ठेवला.हा वाद संपावा यासाठी महाराष्ट्र शासनाने १९६६-६७ साली १) वा.सी.बेंद्रे, २) न.र.फाटक ३) ग.ह.खरे, ४) द.वा. पोतदार, ५) डॉ.आप्पासाहेब पवार, ६) ब.म.पुरंदरे यांची एक समिती स्थापन केली. वादग्रस्त बाबीं साठी शासन समिती स्थापन करते, उदा.श्रीकृष्ण आयोग, न्या.सावंत आयोग बापट आयोग.सराफ आयोग किती तरी आयोग आहेत.त्याप्रमाणे शिवजयंतीची तारीख निश्चित करण्यासाठी शासनाने शिवचरित्र संशोधकांची समिती स्थापन केली. इतिहास तज्ञा बुद्धिजीवी विचारवंताला या कामाला २ वर्ष लागतात, तेथे त्यांना ३० ते ३३ वर्षे लावले, म्हणजेच हा वेळकाढूपणा होता कि नाही?.यासमितीने १९ फेब्रुवारी १६३० ही जन्मतारीख शासनाला सादर केली.१९ फेब्रुवारी ही शिवजयंतीची तारीख जाहीर झाल्याबरोबर कालनिर्णय कॅलेंडरवाले जयंत साळगांवकर यांनी तिथि प्रमाणे शिवजयंती साजरे करावी असे आव्हान केले. त्यासाठी वर्तमानपत्रात जाहीराती दिल्या.या पाठीमागे जयंत साळगांवकरांचे शिवरायांबाबत प्रेम नसून वाद निर्माण करणे ही भूमिका होती. जयंत साळगांवकरांनी तिथीचा आग्रह धरताच त्यासाठी १) पुरंदरे, २) बेडेकर, ३) मेहंदळे यांनी तिथी समर्थनार्थ साळगांवकरांना पत्र दिली.शासनाच्या समितीत असणारे पुरंदरे तिथीच्या म्हणजेच ब्राह्मणांच्या कळपात घुसले. म्हणजे पुरंदरे हे शिवाजी प्रेमी नसून जयंत साळगांवकर इतर ब्राह्मणप्रेमी व विघ्नसंतोषी टिळक प्रेमी आहेत हे सिद्ध झाले.१) जयंत साळगांवकर, २) पुरंदरे, ३) बेडेकर आदि ब्राह्मणांनी शिवजयंती तिथीप्रमाणे व्हावी हा आग्रह धरून आपला ब्राम्हणी कावा दाखविला,त्यामुळे बाळ कडू आणि बाळकडू पिलेले कावळे जोमाने कामाला लागले,शासन प्रशासनाने दिलेले निर्णय आम्ही मानत नाही हे दाखवून दिले,खरे तर लोकशाहीच्या चौकटीत यांच्या वर राष्टपुरुषाचा अवमान केला म्हणुन देशदोहाचा गुन्हा दाखल होऊ शकला असता,पण राज्यकर्ते मनुवादी हिंदुत्व मानणारे असल्यामुळे कोणीच कोणावर कारवाई केली नाही. शिवजयंतीच्या तारीख-तिथीचा वाद कोणत्याही राजकीय पक्षाने निर्माण केलेला नसून पुरुरंदरे, बेडेकर आणि जंयत साळगांवकर यांनी निर्माण केलेला आहे. पण हा वाद सर्वत्र व्हावा यासाठी ब्राह्मणांनी याला राजकीय स्वरुप दिले. अनेक राज्यकर्तांना माहित नाही की हा वाद ब्राह्मणांनी निर्माण केलेला आहे.यासाठी ब्राह्मणांनी नेहमीप्रमाणे धर्म-संस्कृतीचे हत्यार पुढे केले.ब्राह्मणांनी शिवजयंतीच्या तारखेला विरोध तर तिथीचा आग्रह धरला. या मागील षडयंत्र काय? तारखेप्रमाणे शिवजयंती साजरी झाली तर वाद संपून देशात व जगात शिवजयंती होईल, कारण देशातील ग्रामपंचायत, शाळा, कॉलेजेस् पासून न्यायालय, संसद इ.सर्व कारभार तारखेप्रमाणे चालतात. तारीख वर्षातून एकदाच आणि एकाच महिन्यात येते. त्यामुळे वाद संपतो. सरकारी बँका, कार्यालये,शाळा, महाविद्यालयात शिवचरित्रावर भाषणे होतात. त्यामुळे शिवरायांचे खरे शिवचरित्र जनतेला समजते. खरे शिवचरित्र समजले तर बहुजन समाज ब्राह्मणाला माफ करणार नाही, ही भीती ब्राह्मणांना होती. म्हणून ब्राह्मण शिवचरित्रात, जयंतीत वाद निर्माण करतात. म्हणजे प्रतिक्रिया देण्यातच बहुजन समाजाची शक्ती खर्च व्हावी हा ब्राह्मणांचा ब्राम्हणी कावा आहे. हे आज ही ३९४ वी शिवजयंती कोणी कोणी साजरी केली तपासून पाहता येईल. इंग्रजी कॅलेंडर म्हणून तारखेला विरोध करणारे ब्राह्मण मात्र स्वत: इंग्रजी शिकतात. इंग्रजी संगणक, मोबाईल वापरतात. जयंत साळगांवकर कॅलेंडर जानेवारी ऐवजी चैत्र (एप्रिल) महिन्यात का बाजारात आणीत नाहीत? कॅलेंडरमध्ये तारखेचे आकडे मोठे व तिथीचे लहान का टाकतात? ब्राह्मणांना आज इंग्रजी आणि पूर्वी इंग्रजांशिवाय करमत नव्हते ते आज शिवजयंतीच्या तारखेला विरोध करतात.

ब्राह्मण शिवजयंतीसाठी तिथीचा आग्रह का धरतात? तिथीप्रमाणे देशातील कोणताही कारभार चालत नाही. आपले गांव, शाळा, देश तिथीप्रमाणे नाही तर तारखेप्रमाणे चालतो. मग तिथी प्रमाणे वाद कायम का राहतो ?. कारण तिथी कधी मार्चमध्ये तर कधी एप्रिल-मे मध्ये येते. तिथीप्रमाणे ग्रामपंचायत किंवा प्राथमिक शाळा देखील चालत नाही.शिवाजीराजे जर,राष्ट्रपुरुष, युगपुरुष आहेत.तर तिथीत अडकविण्या इतके राजे लहान का करता?. यावर शिवसेनेने कधीच ठाम वैचारिक भूमिका घेतली नाही. म्हणूनच पूर्वीची,आजची शिवसेना आणि शिवजयंती? हा वैचारिक वारसा शोधण्याचा प्रयत्न एक मराठा लाख मराठा यांनी खऱ्या अर्थाने केला पाहिजे. तसे कुठे ही होतांना दिसत नाही.शिवरायांना लहानपण देऊन राजे कायम वादात रहावेत यासाठी जयंत साळगांवकर यांनी तारीख-तिथीचा वाद निर्माण केला.कारण तिथी आली की पंचांग आले, पंचांग आले की भटजी आला. सत्यनारायण महापूजा म्हणजेच भटजीची रोजगार हमी आली व ती चालावी या करीतच हा वाद आहे, तारीख तिथीचा वाद लावून ब्राह्मणांनी शिवभक्तात दोन गट पाडले तारखेचे आणि तिथीचे शिवभक्त असा संघर्ष ब्राह्मणांनी निर्माण केला.त्यामुळे कावळे आणि मावळे संघर्ष अटळ आहे.सूर्याजी पिसाळ आणि लांजाचा पाटील प्रत्येक गावांत पक्षात भेटेल. तो शिवसेना,मनसे,भाजपाचाच असेलचं असे नाही.तो काँग्रेस,राष्ट्रवादी सह इतर पक्षात सुद्धा भेटतो. शिवरायांची दोन वेळा जयंती करुन ब्राह्मणांनी एका महान राजाची टिंगल लावलेली आहे. ब्राह्मण कधी गुरुनानक,महावीर,बुद्ध,महात्मा फुले,राजर्षी शाहू महाराज, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी तिथीचा आग्रह धरतात का? कारण त्यांचा समाज जागा असल्यामुळे ब्राह्मण हे धाडस करत नाहीत.मग शिवरायांचे मावळे कोण?. शिवसैनिक कोण?. एक मराठा लाख मराठा म्हणणारे को?.शिवचरित्रावर विचार करण्याऐवजी जयंतीचा वाद कार्यकर्ते करत होते.यामागे बहुजनांचे अज्ञान तर ब्राह्मणांचा क्रूरपणा होता व आज ही आहे. सत्ताधारी शिवसेना आणि शिवजयंती हा आता नवीन वाद निर्माण करण्याचा प्रयत्न झाला.पण पूर्वीची,आजची शिवसेना आणि शिवजयंती? हा वैचारिक वाद झालाच नाही. मानसिक गुलामी काही केल्या बदली झाली नाही. म्हणूनच बाळकडू पिलेले जेजे कावळे आहेत ते शिवजयंती निमित्ताने सत्यनारायण महापूजा ठेवतात.ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श घेऊन सन्मान करण्यासाठी नव्हे तर मनुस्मृती नुसार शूद्र राजाने शौर्य दाखवुन स्वराज निर्माण करून बहुजन समाजाला न्याय हक्क अधिकार मिळवून दिला यांचा बदला म्हणून अवतारी पुरुष बनविले.शिवसेना आणि त्यांच्या शिवसैनिकांनी या विरोधात कधी आवाज उठवला काय?. उलट महाराष्ट्रातील मराठा समाजाला शिवसैनिकांना न घाबरत जाहीरपणे समर्थन केले. छत्रपती शिवाजी महाराजांना देवीचा आशीर्वाद होता त्यामुळेच त्यांनी लढाया जिंकल्या असा भ्रम निर्माण केल्या गेला. त्याकरिता सत्यनारायण महापूजा घातली जाते. पण हे करतांना छत्रपती शिवाजी महाराज यांनी कधी कोणत्या गड किल्ल्यावर सत्यनारायण महापूजा घातल्याचा इतिहास आहे काय?. मग तिथी नुसार शिवजयंती साजरी करणारी ही मंडळी महाराजांचा सन्मान करीत नसुन घोर अपमान करीत असतात. हे कधी शिव सैनिक,मावळे,एक मराठा लाख मराठा म्हणणाऱ्यांच्या लक्षात येईल?.म्हणूनच जाहीरपणे लिहून विचारतो पूर्वीची, आजची शिवसेना आणि शिवजयंती?.३९४ वी शिवजयंती कोणी कोणी साजरी केली.डोळे उघडे ठेऊन पाहणार आहात काय?.

****

सागर रामभाऊ तायडे.
९९२०४०३८५९,
भांडुप,मुंबई.

वाघापर्यंत प्लास्टिक पोहोचणे चुकीचेच, पण ती एकट्या वनविभागाचीच जबाबदारी कशी?

आज वर्तमानपत्रात आणि समाज माध्यमांमध्ये ताडोबा बफरच्या जंगलामध्ये एक वाघीण प्लास्टिकची पाण्याची रिकामी बाटली तोंडात धरून जात आहे, असे छायाचित्र आणि 'हे वन आणि आणि पर्यटन विभागाचे अपयश आहे', अशा आशयाची वृत्ते प्रसिद्ध झाली आहेत. एखाद्या गोष्टीवरच्या अशा पद्धतीच्या प्रतिक्रियांमुळे वन्यजीव पर्यटनाचे नुकसान होते. प्लास्टिकच्या बाटल्यांचा वापर योग्य आहे किंवा हा फोटो चुकीचा आहे, असे आमचे म्हणणे नाही; पण जिथे गावकरी मुक्तपणे फिरू शकतात, तिथे म्हणजे या गोष्टी ताडोबाच्या बफरमध्ये किंवा कोणत्याही व्याघ्र प्रकल्पाच्या ठिकाणी अशा गोष्टी घडतात. कारण येथे २०० हून अधिक गावे आणि एक लाखाच्या आसपास लोकसंख्या आहे आणि त्यांच्यामध्ये ताडोबाच्या बफरमध्ये २०० वाघ आहेत. निमढेला बफरमध्ये (हे छायाचित्र तिथले असावे, अशी शक्यता आहे) अगदी ऐन जंगलामध्ये मध्य भागात मंदिरे आहेत आणि स्थानिक रहिवासी त्यांच्या इच्छेनुसार या मंदिरांना भेट देतात आणि वाघदेखील तिथे आसपास असतात. वाघ असेच जगणार आहेत, सहजीवनाने! याचा अर्थ असा नाही की पर्यटन थांबवा किंवा कचरा करा पण काळजीही घ्या. अशा गोष्टींवर राग व्यक्त करण्यापेक्षा स्थानिक लोकांना जागृत करा. वनविभाग ही गोष्ट सतत करत आहे आणि पर्यटकांमुळेच तेथील स्थानिक लोक रोजीरोटी मिळवू शकतात. चालण्याच्या पद्धतीत केलेला 'हा' छोटा बदल, स्नायूंची शक्ती व मेंदूची तीक्ष्णता वाढवायला करतो मोठी मदत म्हणून आपण आपले नियोजन करताना त्यामध्ये सर्व प्रजातींवर लक्ष केंद्रित करण्याचा विचार केला पाहिजे किंवा त्यावर भर दिला पाहिजे, तरच आपण त्यांच्यासाठी जागा तयार करू शकू. हा पैलू महत्त्वाचा आहे, कारण एकीकडे ताडोबातील वाघांची संख्या वाढली आहे (म्हणजे चंद्रपूरमधील), तर वाघांच्या मृत्यूंची संख्याही आतापर्यंतची सर्वाधिक आहे. देशामध्ये २०२३ या वर्षामध्ये जवळपास २०० वाघांचा मृत्यू झाला आहे. या वाघांचा मृत्यू वेगवेगळ्या प्रकारे झाला असला तरीही या सर्व मृत्यूंमागचे मूलभूत कारण एकच आहे ते म्हणजे वाघांसाठीची जागा कमी होणे. त्याचा अप्रत्यक्ष अर्थ असा होतो की वनक्षेत्र कमी होणे किंवा अधिवास नाहीसा होणे. हे वनविभागाचे अपयश नसून एक यंत्रणा म्हणून आपल्या नियोजनाच्या क्षमतेचे अपयश आहे. २०० वाघांच्या मृत्यूमध्ये काय एवढे मोठेसे, असे तुम्हाला वाटत असेल तर ही तुलना पाहा.आपल्या देशामध्ये माणसांची संख्या १५० कोटी आहे तर वाघांची संख्या ३,७५० आहे. म्हणजेच जवळपास चार लाख माणसांच्या मागे एक वाघ आहे व वर्षभरात २०० वाघांचा मृत्यू म्हणजे वर्षभरात जवळपास आठ कोटी माणसांचा मृत्यू होण्यासारखे आहे. आता तुम्हाला या आकड्यांचे गांभीर्य समजू शकेल. तुम्ही असे म्हणू शकता की ही तुलना मूर्खपणाची आहे किंवा मला वेड लागले आहे. परंतु प्रत्येक प्रजातीला जगण्यासाठी आणि भरभराट होण्यासाठी त्यांची स्वत:ची जागा असेल, अशा एका जगाची निर्मिती करण्यात आपण अपयशी ठरलो आहोत, ही वस्तुस्थिती बदलणार नाही. आपल्या नियोजनामध्ये केवळ माणसांवरच लक्ष केंद्रित केल्यामुळे, आपण इतर प्रजातींना संपवत आहोत. कारण आपण केवळ माणसांच्या गरजांसाठी नियोजन करत आहोत. माणसांमुळे दररोज केवळ वाघांनाच नव्हे तर बिबटे, हरीण, गेंडे व हत्ती व अशा सर्व प्रजातींना प्रचंड धोका निर्माण झाला आहे. कारण आपण अक्षरश: त्यांच्याच वाट्याचे अन्न खात आहोत, त्यांचे पाणी पीत आहोत व आपल्या गरजांसाठी (म्हणजे हव्यासासाठी) त्यांची घरे नष्ट करत आहोत. केवळ वन्यजीवनच नाही, आपल्या १५० कोटींहून अधिक जनतेला राहण्यासाठी जागा हवी आहे

साळुंके अकॅडमीच्या वतीने विविध सांस्कृतिक सामाजिक उपक्रमांनी शिव जयंती साजरी

लातूर : येथील साळुंके अकॅडमी व डी स्टार डान्स स्टुडिओच्या व बेस्ट हाऊस इलेक्ट्रिक सर्व्हिसेस संयुक्त विद्यमाने विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांनी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैलेश गोजमगुंडे हे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून सेन्हा बरडे मॅडम, प्रतिक्षा साळुंके, राजश्री बनसूडे, डॉ. जयश्री हुजरे यांची उपस्थिती होती. शिवजयंती चे औचित्य साधून चित्रकला, रांगोळी, लोकनृत्य, फॅन्सी ड्रेस स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले होते. त्याचप्रमाणे गडकिल्ले प्रदर्शन, शिवशाही गर्जना, तलवारबाजी, दांडपट्टा प्रदर्शन तसेच सन्मान लातूरकरांचा कार्यक्रमाचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले होते. विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. सन्मान लातूरकरांचा उपक्रमांतर्गत बालाजी सूळ, सृष्टी जगताप, प्रभुराज प्रतिष्ठान, माझं लातूर परिवार, पक्षिमित्र महेबूबचाचा सय्यद, गोरक्षक श्रीकांत रांजणकर, श्रावणी राम घाडगे, एबीपी माझा चे ज्येष्ठ पत्रकार निशांत भद्रेश्वर, धाडस ढोल ताशा पथक, रिलीजअन टु रिस्पॉन्सबिलिटी फाउंडेशन ग्रुप यांना सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना शैलेश गोजमगुंडे यांनी या अभिनव उपक्रमाबद्दल संयोजकांचे कौतुक केले. विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांनी या कार्यक्रमाची शोभा वाढविल्याचे सांगून अन्य संस्था, संगठनांनी याचा आदर्श घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेकानंद साळुंके यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी सविस्तरपणे विषद केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागेश सारगे, सूरज ईरले, सादीकभाई, कमलाकर शिंदे,रणजित मोहिते पाटील आदित्य, शुभम आस्तुरे यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भाजपा युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्याकडून विनम्र अभिवादन

लातूर :- श्रीमंतयोगी, नीतीवंत, बुद्धिवंत, गुणवंत, यशवंत, किर्तीवंत, सामर्थ्यवंत, पुण्यवंत, न्यायवंत, क्षत्रियकुलावतंस, जाणता राजा छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस भाजपा युवा नेते ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांनी पुष्पहार घालून पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या लातूर येथील संवाद कार्यालयात झालेल्या शिवजयंती कार्यक्रमास भाजपाचे प्रदेश सदस्य अनिल भिसे, रेणापूर तालुकाध्यक्ष अॅड. दशरथ सरवदे, संजय गांधी निराधार योजना समिती अध्यक्ष वसंत करमुडे, विजय काळे, चंद्रकांत कातळे, अशोक सावंत, गोपाळ शेंडगे, भागवत गिते, अमर चव्हाण, संतोष चव्हाण, दत्ता सरवदे, विपुल चेपट, माधव गुडे, सुकेश भंडारे, धनंजय बिक्कड, राज जाधव, अनिकेत बुड्डे, कार्तिक गंभीरे, लक्ष्मण खलंग्रे, ओम चप्पे, सुधाकर फुले यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठा समाजाचा अहवाल राज्य सरकारकडून मंजूर

मुंबई : राज्य मागासवर्गाचा अहवाल राज्य सरकारकडून मंजूर करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. या अहवालात मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास ठरवण्यात आले आहे. तसेच समाजाला १० टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.-मराठा समाज हा राज्यभरात २८ टक्के असल्याचे न्या. शुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेला मागासवर्गीय आयोगाला आढळून आले.-सुमारे ५२ टक्के आरक्षण असणा-या मोठ्या संख्येतील जाती व गट आधीच राखीव प्रवर्गात आहेत.-त्यामुळे राज्यातील २८ टक्के असलेल्या अशा मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गात ठेवणे पूर्णपणे असामान्य ठरेल अशी माहिती आयोगाने अहवालात दिली आहे मसुद्यात काय नमूद करण्यात आले आहे?भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड एक मध्ये निर्दिष्ट केलेल्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था व्यतिरिक्त इतर शैक्षणिक संस्था तसेच खाजगी शैक्षणिक संस्था मग त्या राज्याकडून अनुदान प्राप्त असोत किंवा अनुदान प्राप्त नसोत यांमधील प्रवेशाचे एकूण जागांच्या दहा टक्के आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील सरळ सेवा भरतीचे एकूण नियुक्त्यांच्या दहा टक्के इतके आरक्षण सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठी स्वतंत्रपणे राखून ठेवण्यात येईल.

रूग्णसेवेतून लातूर फर्टिलाइझर्स असोसिएशन च्या वतीने छत्रपती शिवजन्मोत्सव साजरा

लातूर /प्रतिनिधी :- लातूर रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लातूर तालूका फर्टिलायझर्स असोसिएशनच्या वतीने रूग्णाना फलआहार, ब्लँकेट व रूग्णाच्या नातेवाईकांना भोजनाची व्यवस्था करून छत्रपती शिवराचा जन्मोउत्सव साजरा करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजातील सर्व जाती धमातील सवंगड्याना साथील घेवून रयतेसाठीच स्वराज्य निर्माण केले. शिवरायांची हीच प्रेरणा घेवून लातूर तालूका फर्टिलाएझर्स,पेस्टीलाएझर्स आणि सीड्स डिलर असोसिएशनच्या वतीने दरवर्षी सामाजिक उपक्रम राबवून शिवजन्मोत्सवाचा जागर केला जातो यावर्षीही असा सामजिक उपक्रम राबवत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील गरजू व गरिब रूग्णाना फलआहार, ब्लँकेट व रूग्णाच्या नातेवाईकांना भोजनाची व्यवस्था करण्यात आली त्याचबरोबर रूग्णाची अस्थवाईकपणे विचारपूस करून आवश्यक ती मदत करण्यात आली.यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन मोहि, डॉ.प्रणिती पाटील, सहकारी डॉक्टर व रूग्णालयातील इतर स्टाफ उपस्थित होता. प्रारंभी शिवनेरी गेट मार्केट यार्ड येथे माजी आ.वैजनाथराव शिंदे असोसिएशनचे अध्यक्ष प्रदिप सोनवणे ,भिमाशंकर मद्रेवार,तालुका अध्यक्ष विठ्ठल तळेकर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी फर्टिलाएझर्स असोसिशनचे उपाध्यक्ष निलेश भुतडा ,सचिव राजकुमार शिंदे,जिल्हा सचिव आनंद अग्रवाल, सहसचिव विजय कदम,उपाध्यक्ष नेताजी रणखांब, जयेश झंवर, कृष्णा खानापूरे,शाहुराज मोरे, अशोक तिरके, भोसले, अॅड.यशवंत चव्हाण,पत्रकार संदीप भोसले,अरूण हांडे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी माजी.आ.वैजनाथ शिंदे यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याचा आर्दश घेवून फर्टिलाइझर्स असोसिएशनच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले तर असोसिएशनचे अध्यक्ष प्रदिप सोनवणे आणि भिमाशंकर मद्रेवार यांनी खते बी बियाणे विक्रेत्यांच्या वतीने समाज सेवेचे हे व्रत असेच सुरू ठेवण्याचा संकल्प यावेळी केला.या कार्यक्रमास व्यापारी, शेतकरी, आडते मार्केट यार्ड परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रेमाचं प्रतीक असलेल्या गुलाबाचे प्रकृतीसाठी फायदे तुम्हाला माहिती आहेत का?

प्रेमाचं प्रतीक असलेल्या गुलाबाचे तब्येतीसाठी फायदे तुम्हाला माहिती आहेत का? (छायाचित्र - लोकसत्ता ग्राफिक्स टीम)'मला माझं रोजचं रोझ इन्फ्युजन आवडतंय. खरं सांगायचं तर गेले काही दिवस झोप पण खूप छान पूर्ण होतेय', निमाली सांगत होती. निमालीच्या स्वरात आश्चर्य आणि समाधान दोन्ही जाणवत होतं.'आय एम सुपर हॅप्पी फॉर यू', मी उत्तरले. आहारात गुलाबाच्या पाकळ्यांचा समावेश करताना निमालीने आढेवेढे घेत हे पण करून पाहते असं म्हटलं होतं.त्यामुळे तिला जाणवलेल्या परिणामामुळे गुलाब आहारात असण्यावरचा माझाही विश्वास वाढला.गुलाब - अनेक पिढ्यानी विश्वासाने प्रेमाचं प्रतीक म्हणून साजरं केलेलं फूल. कधी सिनेमांमधून तर कधी कथाकल्पनांतून वेगेवेगळ्या रूपात प्रतीक म्हणून बिंबवलं गेलेलं फूल. रक्ताचा रंग लाल म्हणून हृदयीचे गूज सांगणारं लाल फूल म्हणजे गुलाब -असं आपल्या मनावर कोरलं गेलेलं फूल.रामलल्लासाठी सोन्याचे जोड ते २१०० किलोंची घंटा; अयोध्येत पोहचल्या 'या' १० अनोख्या भेटवस्तू आहारशास्त्रामध्ये मात्र गुलाब , त्याच्या विविध गुणांसाठी प्रसिद्ध आहे. विशेषतः गुलाबाच्या पाकळ्या वाळवलेल्या रूपात जास्त महत्वाच्या आहेत.वाळवलेल्या पाकळ्यांमध्ये पोषणघटकांचे उत्तम प्रमाण आढळून येते. साधारण १०० ग्राम पाकळ्यांमध्ये ७०ग्राम कर्बोदके (कार्ब्स), १.२ ग्राम तंतूमय पदार्थ (फायबर), ३ मिग्रॅ लोह , १२० मिग्रॅ इतकं कॅल्शिअम आढळते. शिवाय गुलाबाच्या पाकळ्यात आढळणारे फ्लॅव्होनॉइड्स आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी आहेत. वाळवलेल्या गुलाबाच्या पाकळ्यांचे अनेक उपयोग आहेत. त्यातील काही उपयोग खालीलप्रमाणे :.-मानसिक ताण कमी करणे.-आतड्याचे स्वास्थ्य जपणे -अजीर्ण कमी करणे . -कोरड्या त्वचेची आर्द्रता राखणे -त्वचा तजेलदार होणे -पेशींचे आरोग्य जपणे -मासिक पाळीदरम्यान पोटदुखी कमी करणे -उत्तम झोप लागणे -स्नायूंचा थकवा कमी होणे .-सर्दी खोकला कमी करणे -शरीराचे तापमान कमी करणे -खाद्य पदार्थाला नैसर्गिक रंग देणे -खाद्य पदार्थांमध्ये गोडसर चव आणणे -हृदय रोगापासून रक्षण करणे गुलाबाचा आहारात नियमितपणे वापर करण्यासाठी १. गुलकंद : गुलाबाच्या पाकळ्या आणि गूळ किंवा साखर एकत्र करून तयार केलेला गुलकंद विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसात अत्यंत फायदेशीर असतो. पोटाचे आणि मनाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी तसेच शरीरात थंड पदार्थ खाण्यापेक्षा १ छानसा गुलकंद नियमित खाणे उन्हाळ्यातील गोड पदार्थांच्या क्रेविंग्स पासून रक्षण करू शकते.२. गुलाबाचे पाणी - ज्यांना पित्त विकार आहेत त्यांच्यासाठी गुलाबाच्या पाकळ्या रात्रभर भिजत घालून सकाळी पाणी प्यायल्यास उत्तम आराम पडतो. ज्यांना रुक्ष त्वचा किंवा तारुण्यपिटिका आहेत त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्यात गुलाबाच्या पाकळ्या भिजवून पाणी प्यायल्यास साधारण ३ ते ६ आठवड्यात उत्तम परिणाम दिसून येतात.३. वाळवलेल्या पाकळ्या : गुलाबाच्या वाळवलेल्या पाकळ्या चहामध्ये एकत्र करून प्यायल्यास ऍसिडिटी कमी होते. कॉफीच्या पाण्यात किंवा गरम दुधात गुलाबाच्या पाकळ्या एकत्र केल्यास त्याला उत्तम रंग येतो तसेच कॉफी आणि दुधाला हलका गोडसर स्वाद देखील येतो. अनेक कॉफीच्या दुकानांमध्ये देखील गुलाबाच्या पाकळ्यांची पावडर कॉफी तयार करताना वापरली जाते. घरच्या घरी लाडू तयार करताना देखील सुक्यामेव्यासोबत गुलाबाच्या पाकळ्या त्यात एकत्र करू शकतो.

फक्त दोन ते तीन आठवड्यांमध्ये कलौंजीचे तेल त्वचा, केस अन् आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते का?

: दररोजच्या धावपळीच्या आयुष्यात अनेकदा आपण आपली त्वचा आणि केस यांच्या आरोग्याकडे लक्ष देत नाही. त्वचा आणि केसांचे सौंदर्य राखण्यासाठी जरी तुम्ही नवनवीन गोष्टींचा वापर करीत असाल तरी अनेकदा याचा काहीही फायदा होत नाही. सोशल मीडियावरही याबाबत सल्ले देणारे अनेक व्हिडीओ व्हायरल होत असतात. सध्या असाच एक व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये उपाशीपोटी एक चमचा कलौंजीच्या तेलाचे सेवन करण्यास सांगितले आहे. त्यामुळे त्वचा, केस आणि आतड्यांचे आरोग्य चांगले राहते, असे या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये लिहिलेय, जर तुम्हाला खालील समस्या असेल, तर तुम्ही तुमच्या दिनचर्येत कलौंजीच्या तेलाचा समावेश करू शकता.१. पुरळ, सोरायसिस यांसारख्या त्वचेच्या समस्या २. पचनाशी संबंधित समस्या ३. सांधेदुखी ४. वारंवार आजारी पडणे, कमकुवत रोगप्रतिकार शक्ती हा उपाय फक्त तुमची ऊर्जा वाढवत नाही, तर तुमची त्वचा निरोगी ठेवतो आणि पचनक्रियादेखील सक्षम राहते. कलौंजीचे तेल पॉवरहाऊस आहे. काळ्या बियांच्या तेलाचे नियमित सेवन केल्यानंतर तुम्हाला दोन ते तीन आठवड्यांत बदल दिसून येईल.पुढे कॅप्शनमध्ये लिहिलेय, कलौंजीच्या तेलाचे फक्त तुम्ही सेवनच करायचे नाही, तर ते तेल तुम्ही आहारातून घेऊ शकता, तसेच त्वचेला लावण्यासाठीही वापरू शकता. या तेलाने केसांना मालिश करू शकता. त्वचेची काळजी घेण्यासाठी आणि केसांच्या वाढीसाठी कलौंजीचे तेल खूप फायदेशीर आहे.हे कलौंजीचे तेल नायजेला सॅटिवा या वनस्पतीपासून काढले जाते आणि या कलौंजी काळ्या बिया असतात. त्याचे आरोग्यास अनेक फायदे आहे. या तेलाच्या सेवनामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढते, पचनक्रिया सुधारते आणि आरोग्यास अनेक फायदे मिळतात; पण हे फायदे खरेच दोन ते तीन आठवड्यांमध्ये मिळू शकतात का? कलौंजीच्या तेलामध्ये थायमोक्विनोन, थायमॉल व थायमोहायड्रोक्विनोन असतात; जे शरीराला अँटिऑक्सिडंट्स गुणधर्म पुरवतात. जिंदाल नेचरक्युअर इन्स्टिट्युटच्या प्रमुख आहारतज्ज्ञ सुषमा पीएस सांगतात, सकाळी उपाशीपोटी एक चमचा कलौंजीच्या तेलाचे सेवन करणे सामान्य गोष्ट आहे.कलौंजीच्या तेलाबाबत प्रत्येकाचा वैयक्तिक अनुभव वेगवेगळा असू शकतो. काही लोकांना दोन ते तीन आठवड्यांत बदल दिसू शकतात. आहारतज्ज्ञ डॉ. अर्चना बत्रा सांगतात, यातील अँटिऑक्सिडंट्स गुणधर्मामुळे कलौंजीचे तेल चेहऱ्यावरील मुरमे दूर करते. नियमितपणे हे तेल वापरल्यामुळे त्वचा सुंदर आणि निरोगी होत असल्याचे दिसून येते.डॉ. बत्रा पुढे सांगतात, या तेलाचा नियमित वापर केल्यामुळे व्यक्तीची ऊर्जा पातळी वाढते आणि जीवनशैली सुधारते. रोगप्रतिकार शक्तीसाठी कलौंजीचे तेल शारीरिक क्षमता वाढविण्यास मदत करते. आहारतज्ज्ञ सुषमा पीएस सांगतात, कलौंजीचे तेल हे चांगल्या आहाराच्या दृष्टिकोनातून आणि विशिष्ट आरोग्याच्या समस्यांसाठी फायदेशीर आहे; पण याचा फायदा प्रत्येकालाच होईल, असे नाही. प्रत्येकाला वेगवेगळे अनुभव येऊ शकतात, हे लक्षात घ्यावे. जर तुम्हाला एखादी आरोग्याची समस्या असेल आणि त्यासाठी तुम्ही कलौंजीचे तेल वापरत असाल, तर त्यापूर्वी तुमच्या जवळच्या तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

विविध डाळींचा वापर पोषकतत्त्वांसाठी कसा करावा?

चणाडाळ, मूगडाळ, उडिद डाळ आणि तूरडाळ आदी सर्व डाळींचा वापर भारतीय घरांमध्ये नियमित होतो. परंतु, काही वेळेस या डाळी आपण ज्या पद्धतीने वापरतो त्यामुळे अनेकांना त्याचा त्रासही होतो. मुद्दा असा की, या डाळींचा वापर थांबवू नका कारण त्या पौष्टिक आहेत. कदाचित त्यांचा वापर करताना आपल्याला त्यांच्या वापराची पद्धत बदलावी लागेल. कोणत्या डाळीसाठी कोणती पद्धत वापरायची यासाठी विचारपूर्वक निर्णय घ्यायला हवा. त्या संदर्भातील हे महत्त्वाचे टिपण.
मला चणे खाऊन त्रास होतो, पोट बिघडतं विनय सांगत होता .
नक्की काय त्रास होतो? मी विचारलं
एक तर गॅसेस, पोट फुगणे आणि मग दिवसभर अस्वस्थ वाटत राहतं
तू शिजवून खातोस की कच्चे?
म्हणजे?, आपण नेहमी भाजके चणे खातो तसे मी भिजलेले चणे खातो. मला सगळ्याच उसळींनी त्रास होतो
पुढच्या वेळेस शक्यतो चणे उकडून खा आणि उकडताना शक्यतो १ चमचा तेल वापर
हे नवीन आहे. आर यू शुअर ? विनयने अविश्वासाने विचारलं हो
शाकाहारी आहार घेणारी मंडळी प्रथिनांचे प्रमाण वाढविण्यासाठी अनेकदा विविध कडधान्ये खातात आणि अनेकदा ती कच्चीच खाल्ली जातात आणि त्यामुळे अपचनाचा त्रास होऊ शकतो.
डाळी आणि कडधान्ये- नेहमीच्या भारतीय आहारातील महत्वाचा अन्न घटक आहेत. सुमारे १० हजार वर्षांपासून मानवी आहारात कडधान्य आणि डाळींचा वापर केला जातो. आयुर्वेदामध्ये देखील डाळी आणि कडधान्यांचे विविध उपयोग सांगितले गेले आहेत. भारतात विविध रंगांच्या डाळी आणि कडधान्ये उपलब्ध आहेत.आजच्या लेखात विविध डाळींबद्दल जाणून घेऊ.
१. तूर डाळ :
पचायला जड, अत्यंत चविष्ट आणि पटकन शिजणारी डाळ म्हणून तुरडाळीचा वापर भारतीय घरांत केला जातो. प्रथिनांचे आणि कर्बोदकांचे उत्तम प्रमाण असणारी तूरडाळ शरीरासाठी मात्र तितकीशी पोषक ठरत नाही. कफ, त्वचेचे विकार, मेंदूशी संबंधित विकार असणाऱ्यांसाठी तूरडाळ वर्ज्य करावी. नियमित व्यायाम करणाऱ्यांसाठी किंवा शारीरिक श्रम करणाऱ्यांसाठी तूरडाळ आवश्यक ऊर्जा देणारी डाळ आहे .
२. उडीद डाळ :
पांढऱ्या आणि काळ्या अशा दोन रंगात उपलब्ध असणारी उडीद डाळ आहारशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. उत्तम प्रथिने आणि फोलेटचे प्रमाण असणारी उडीद डाळ पोषक आहे. ज्यांना वजन वाढवायचे आहे त्यांनी नियमितपणे उडीद डाळीचे सेवन करावे. उडदाचे पापड, लापशी, उपीट वजन वाढविण्यासाठी तर आंबवलेले उडीद (डोसा, इडली, अप्पम इत्यादी) वजन प्रमाणात राखण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी उपयुक्त आहे .३. मूग डाळ :पिवळ्या किंवा हिरव्या रंगात उपलब्ध असणारी मूगडाळ शरीरासाठी अत्यंत पोषक आणि पचायला हलकी आहे.

छत्रपती शिवजी महाराज जयंती निमित्त गोकुंदा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन:

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त गोकुंदा येथील ठाकरे चौकात संदीप केंद्रे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या निशुल्क रक्त व आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून या शिबिरात शेकडो नागरिकांनी सहभाग घेऊन रक्त व आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. संदीप केंद्रे मित्र मंडळाच्या वतीने गोकुंदा येथील ठाकरे चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. प्रथमता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करून युवानेते संदीप केंद्रे यांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उदघाटन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला शिवप्रेमी बांधव तसेच गोकुंदा येथील शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. किनवट येथील महालॅब रक्त संकलन केंद्रातील कर्मचाऱ्यांनी रक्त तपासणी केली तर डॉ चंद्रमणी झडते, डॉ कविता जाधव, डॉ अविनाश पवार, डॉ भारती अविनाश पवार यांनी थायरॉईड,लिव्हर फंक्शन टेस्ट किडनी फंक्शन टेस्ट यासह अन्य दुर्धर आजारासंबंधी आरोग्य तपासणी केली. यासाठी कोठारी येथील विवेक मेडिकल यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी संदीप केंद्रे मित्र मंडळाचे इंद्रदीप वाघमारे, अनिल ईरावार, रोहित भिसे, विकास वाघमारे, कृष्णा हुरदुखे, गणेश करणेवार, सोनू गायकवाड, माणिक शेवाळे, महेश उर्वते, पवन साळुंखे, शिवा पवार सत्यम भिसे आदींनी अथक परिश्रम घेतले.

शिवा पवार सत्यम भिसे आदींनी अथक परिश्रम घेतले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त गोकुंदा येथील ठाकरे चौकात संदीप केंद्रे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या निशुल्क रक्त व आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून या शिबिरात शेकडो नागरिकांनी सहभाग घेऊन रक्त व आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. संदीप केंद्रे मित्र मंडळाच्या वतीने गोकुंदा येथील ठाकरे चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.प्रथमता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करून युवानेते संदीप केंद्रे यांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उदघाटन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला शिवप्रेमी बांधव तसेच गोकुंदा येथील शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. किनवट येथील महालॅब रक्त संकलन केंद्रातील कर्मचाऱ्यांनी रक्त तपासणी केली तर डॉ चंद्रमणी एक्सझडते, डॉ कविता जाधव, डॉ अविनाश पवार, डॉ भारती अविनाश पवार यांनी थायरॉईड,लिव्हर फंक्शन टेस्ट किडनी फंक्शन टेस्ट यासह अन्य दुर्धर आजारासंबंधी आरोग्य तपासणी केली. यासाठी कोठारी येथील विवेक मेडिकल यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी संदीप केंद्रे मित्र मंडळाचे इंद्रदीप वाघमारे, अनिल ईरावार, रोहित भिसे, विकास वाघमारे, कृष्णा हुरदुखे, गणेश करणेवार, सोनू गायकवाड, माणिक शेवाळे, महेश उर्वते, पवन साळुंखे, शिवा पवार सत्यम भिसे आदींनी अथक परिश्रम घेतले.

छ. शिवाजी महाराजासारख्या धर्मनिरपेक्ष राजाची देशाला गरज –प्रा.डॉ.संजय शिंदे

छ.संभाजी नगर(प्रतिनिधी) आज भाताला छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या धर्मनिरपेक्ष राजाची ख–या अर्थाने गरज आहे असे प्रतिपादन प्रा.डॉ. संजय शिंदे यांनी वसंतराव नाईक महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित व्याख्यानात केले छत्रपती शिवाजी महाराज हे धर्म निरपेक्ष लोकशाही, स्त्रियां, लहान मुलं, धर्म ग्रंथ आणि श्रध्दास्थानाचा आदर करणारे मानवतावादी राजे होते.आपल्या राज्यातल्या बहुजन समाजाला आपले कुटुंब माणूण त्यांच्यातील स्वत्व जागे करून स्वराज्याची स्थापना केली, आपल्या राज्यात स्त्रियांवर अन्याय करणा–याला जब्बर शिक्षा ठोठावली,अठरा पगड जातीतील मावळे एकत्र करून जुलमी,अन्यायी राजवटीविरूध्द संघर्ष केला हे करत असताना कोणत्याही धर्माचा तिरस्कार केला नाही, शहाजी राजांच्या मृत्यूनंतर मॉ. जिजाऊ सती जायला निघाल्या परंतु हजारो वर्षांपासून चालत आलेली अनिष्ट प्रथा महाराजांनी १६६४ ला बंद केली आणि पुरोगामी विचाराला आपल्या घरातून सुरूवात केली, अन्याय करणा–या वतनदाराचे वतन खालसा केली आणि दलित, बहुजन समाजातील लोकांना गावचे पाटील केले, महारांजाच्या सैन्यात ५७/% मुस्लिम सैनिक होते त्यांच्याही धर्माचा आदर केला, महाराजांच्या आरमाराचा प्रमुख इब्राहिम खान, पायदळ प्रमुख नुरखा बेग, गुप्तहेर बहिर्जी नाईक, शिवाजी काशीद,अंगरक्षक जिवा महाला हया सगळ्या बहुजन समाजातील लोकांनवर विश्वास ठेवून आपल्या स्वराज्याची वाटचाल केली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक शिक्षण संस्थेचे सचिव नितीन राठोड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ तेजनकर उपस्थित होते, डॉ.तेजनकर म्हणाले की, स्वराज्याच्या अगोदर महाराष्ट्रात प्रचंड अन्याय होत होता , व्यापारी सैन्याला भित होते सामान्य माणूस सैन्याला भित होते गरीबांचे जगने अवघड झाले होते म्हणून महाराजांनी स्वराज्याची संकल्पना पुढे आणली,छत्रपती शिवाजी महाराज हे मानवतावादी राजे होते, सर्व समाजाच्या लोकांचे हित कशात आहे ते बघून निर्णय घ्यायचे असे बहुजन प्रतिपालक राजे होते.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रबंधक, उपप्राचार्य प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य गीता कावळे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ चंद्रकांत चोरघडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ बालाजी जोकरे यांनी मानले.

संभाजी महाविद्यालयात शिवजयंती महोत्सव साजरा

मुरूड/महेंद्र आल्टे : शिवजयंती महोत्सवानिमित्त संभाजी महाविद्यालयामध्ये भित्तिपत्रकाचे प्रकाशन, मार्गदर्शन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयाच्या इतिहास व इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन व कार्यावर व्याख्यानाचा कार्यक्रम, भित्तीपत्रकाचे उद्घाटन व बहुपर्यायी परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड येथील इतिहास विभाग प्रमुख तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.राहुल वरवंटीकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळम उपस्थित होते. तसेच इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ. मीना कदम यांचीही यावेळी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या विशेष अशा उल्लेखनीय कृषी व्यवस्था, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरण संतुलन–संरक्षण, जल व्यवस्थापन या विषयावरील इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे तसेच इंग्रजी विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन शिवजयंती महोत्सवाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिनांक १८ फेब्रुवारी २०२४ रोजी इतिहास व इंग्रजी विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या १६ विद्यार्थ्यांचा गुणगौरव त्यांना स्पर्धा परीक्षेचे पुस्तक देऊन त्यांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला . त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.राहुल वरवंटीकर यांनी असामान्य व्यक्तिमत्व असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर प्रकाश टाकला महाराज असामान्य कर्तुत्वाचे होते म्हणून वर्तमान लोकशाहीच्या युगामध्ये सुद्धा आपण आदर्श राजाचे गुणगान गातो यातच सर्वस्व सामावले आहे असे मत व्यक्त केले तसेच छत्रपती शिवाजी महाराजांना जेमतेम ५० वर्षाचे आयुष्य प्राप्त झाले तरीपण जगाच्या इतिहासामध्ये त्यांच्या नावाला केवळ त्यांच्या नीतिमान कर्तृत्वामुळे आजही प्रसिद्धी प्राप्त झालेली दिसून येते. असे मत त्यांनी व्यक्त केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक कळम यांनी महाराजांच्या विविध गुणांवर प्रकाश टाकून त्यांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनावर जगातील कोणत्याच इतिहासकारांचा आक्षेप नाही अशा आदर्श राजांचे चरित्र विद्यार्थ्यांनी वाचून ते आपल्या अंगी स्वीकृत करावे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले या कार्यक्रमाच्याप्रसंगी पाहुण्यांचा परिचय डॉ.राजेसाहेब भोसले यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ.डी. एम. रणदिवे यांनी तर कार्यक्रमाचे आभार आय.क्यू.ए.सीचे समन्वयक प्रा. एम बी. गायकवाड यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.कॉम.तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. श्रद्धा शिंदे यांनी केले. कार्यक्रमास प्रा. राहुल पवार, प्रा. शैलेंद्र सुतार, प्रा. दत्ता पवार आदी प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, विद्यार्थी विशेष करून विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

बीड जिल्यातील दामू नगर कांदिवलीत वास्तव असलेला मुस्लिम समाजातील पहिला पत्रकार चेहरा.

माझे वडील दिवंगत पापामिया शेख यांची खूप मोठी स्वप्न, इच्छाआकांश होती माझ्या मुलांनी शिकावं खूप मोठं व्हावं,आम्हाला जे दिवस गेले,ते माझ्या पोराच्या वाट्याला येऊ नये,अशी माझे वडिलांची महत्त्वाकांक्षा होती. अडाणी असून माझे वडील दिवंगत पापामिया शेख लहानपणापासूनच मला शिक्षणाची गोडी निर्माण केली. अधून मधून महानगरपालिकेत शाळेत भेट देत माझ्या अभ्यासाची विचारपूस करे ,गरीबाचा पोर आहे,विशेष लक्ष द्यावं असं शिक्षकांना हात जोडून विनवणी करत असे, माझ्या मुलगा शिक्षणात तरबेज व्हावं म्हणून मला एक्ट्रा शिकवणी(क्लास) लावण्यात आले. क्लास मध्ये येऊन माझ्या प्रगतीचा आढावा घेत होते,अधून मधून जुन्या कथा सांगत व महापुरुषाचे दाखले देत शिक्षणाचे महत्व पटवून दिले. माझे लेकरू मोठा होऊन नावारूपाला पुढे यावं, आमचं नाव पुसाव स्वतचं नावारूपाने पुढे यावे ही महत्वकांशा नेहमी तांच्या मनात होती. किती ही मोठं संकट आल तरी ही प्रामाणिकपणा व इमानदारपणा सोडू नये. अशा असा सल्ला वारंवार देत असे ... आज बीड जिल्ह्यातील मूळ गाव चिखलबीड,तालुका वडवणी या खेड्या गावातून मुंबईत दामू नगर कांदिवली पूर्व येथे पोटाची खळगी भरण्यासाठी स्थलांतर असलेला बीड जिल्हातील असंख्य मुस्लिम बांधव या विभागात वास्तव्यास आहे. सन १९७२ या दुष्काळ काळात बीड जील्हातील आमच्या समाजातील असंख्य मुस्लिम समाज बांधवांनी उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. येथे येऊन शून्यातून विश्व निर्माण केले. व आपले अस्तित्व निर्माण केले. त्यात माझे वडील सुद्धा होते. माझे प्राथमिक शिक्षण मुनसीपल आकुर्ली शाळा नो २ . येथे झाले. हायस्कूल व म् हाविद्यायालयीन शिक्षण अनुदत्त्व शाळा व ज्युनिअर कॉलेज क्रांती नगर म्हाडा येथे पूर्ण झाले.सन २००२ दहावी उत्तीर्ण झालो.सन २००४ रोजी बारावी उत्तीर्ण झालो, या काळात अनेक अडचणींना सामोरे जात शिक्षण पूर्ण केले. आमचा बीड जिल्हा मुस्लिम समाजातील शिक्षणाबाबत मागास समाज त्या काळी होता,यावेळी फारसा कोणीही शिकले नसल्याने आम्हास शैक्षणिक करियर मार्गदर्शन न मिळाल्याने शिक्षण पूर्ण करून चांगल्या हूद्यावर जाता आले नाही.याची खंत आज ही मनात कायम आहे,महाविद्यालय शिक्षण पूर्ण करून आम्ही कुठेतरी छोटे मोठे कामधंद करू लागलो. याचबरोबर शिक्षणाचे कास मनात नेहमी कायम होती, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यावर सुशिक्षित लोकांच्या सहवासात राहून अतिरिक्त ज्ञान संपादन केले, व आचरणात आणले. आज माझ्या बरोबरचे वर्ग मित्र चांगल्या हुद्द्यावर आहे. सन २०१९ सोशल वर्कर ना. म. जोशी समाज कार्य वर्ग परळ मुंबई येथे कोर्स पूर्ण केला,त्याचबरोबर सन २०२१ मध्ये आनंद गुरुकुल विश्वविद्यालय ठाणे येथून पत्रकारितेची विद्या संपन्न केले. याच आदल्या काळात २०१२ नंतर राजकारणाची संपर्क आला. आदरणीय ऍड. प्रकाश आंबेडकर यांचे नेतृत्व स्वीकारले व राजकारणात व आंबेडकरी चळवळीत सक्रिय कार्यकर्ता म्हणून काम करू लागलो. बीड जिल्ह्यातील दामू नगर येथे मुस्लिम समाजात वास्तव्यास असलेल्या समाजामध्ये पहिला विशेष कार्यकारी अधिकारी तसेच पत्रकार म्हणून नावलौकिक मिळवली. राजकारण व समाजसेवा व पत्रकाराची अद्भुत जोड असल्याने समाजात उभरते नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे. आज मी पत्रकार झाल्याचा आनंद चेहऱ्यावर नेहमी कायम आहे.

हा लेख शहामत शेख यांच्या विचारातून साभार...

आझाद मैदान मुंबई येथे २२ फेब्रुवारी पासून महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनचे भव्य धरणे आंदोलन

लातूर :– परिचारिका संवर्ग हा अत्यंत सेवाभावी वृत्तीने सेवा देणारा, बहुतांश महिला कर्मचारी असलेला संवर्ग असून सन, उत्सव बाजूला ठेवून (रात्र पाळी करणारा) २४*७ सेवाशुश्रुषा करणारा संवर्ग गेले अनेक वर्ष व्यावसायिक व वैयक्तिक पातळीवर असंख्य समस्यांना तोंड देत सेवा देत आहे. राज्यातील या संवर्गाचे प्रतिनिधित्व करणारी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना, मुख्यालय लातूर ही एकमेव शासनमान्य संघटना असून, ही संघटना राज्यातील परिचारिकांच्या संवेदनशील मागण्यांसाठी सनदशीर मार्गाने कार्य करीत आहे. परिचारिकांच्या अनेक महत्वाच्या मागण्यांसाठी संघटनेच्या स्तरावरून वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे. राज्यातील परिचारिकांनी आपल्या अतिसंवेदनशील न्यायिक व रास्त मागण्यांसाठी कधीही शासनास वेठीस धरले नाही. कोव्हिड महामारीच्या काळात, आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक काळजी, जबाबदाऱ्या, बाजूला ठेवून, कुटुंब मुलांबाळापासून दूर राहून, जिवाजी पर्वा न करता, डॉक्टरांच्या खांद्याला खांदा लावून कोव्हिड रुग्णांना परिचारिकांनी सेवा दिली आणि आजही देत आहेत. म्हणूनच त्यांना फ्रंट लाइन कोरोंना योद्धा असेही संबोधले गेले. परंतु आजतागायत त्यांच्या मागण्याकडे पूर्णत: दुर्लक्ष केले जात आहे, त्यामुळेच नाईलाजास्तव राज्यातील परिचारिकांना, मी २०२२ मध्ये बेमुदत आंदोलन करावे लागले व त्याअनुषंगाने माजी मंत्री (वै. शि) यांच्या मंत्रालयातील दालनात संबंधित सर्व तत्कालीन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक झाली व परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य करून त्याची पूर्तता, १५ जुलै २०२२ पर्यन्त, पूर्ण करण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले व तसे बैठक इतिवृत्त ही निर्गमित केले. त्यान्वये राज्यातील विविध वैद्यकीय संस्थामध्ये परिचारिका संवर्गाची कायमस्वरूपी पदे भरण्यात येत आहे त्याबद्दल राज्यातील परिचारिका शासनाचे आभार व्यक्त करत आहेत.

परंतु, वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य विभाग, राज्य कामगार विमा रुग्णालये ईत्यादी विभागातील परिचारिकांच्या इतर प्रमुख मागण्यासाठी वारंवार पाठपुरावा करूनही अद्यापपर्यन्त कार्यवाही झाली नाही. जसे सार्वजनिक आरोग्य विभागाने २०२१ मध्ये मंजूर केलेल्या सेवाप्रवेश नियमातील जाचक अटी रद्द करणे. परिवीक्षाधीन कालावधी खंडित करण्यासाठी लादण्यात आलेली परीक्षा रद्द करणे, वैद्यकीय शिक्षण विभागातील शुश्रुषा, शैक्षणिक,व प्रशासकीय अशा विविध स्तरावरील पदोन्नती मागील ४ वर्षात करण्यात आलेल्या नाहीत. विविध स्तरावरील ५०% हून अधिक पदोन्नतीने भरावयाची रिक्तपदे तातडीने भरण्यात यावी. सर्व शासकीय परिचर्या महाविद्यालयात प्राचार्य–उपप्राचार्य,प्राध्यापक, पाठयनिर्देशिका, तसेच नविन संस्थामध्ये तज्ञ परिसेविकांची पदाची सेवाप्रवेश नियम मंजूर करून पदनिर्मिती करणे. त्याचबरोबर परिचारिकांची ४० वर्षापासून प्रलंबित असलेले भत्ते केंद्र शासनाप्रमाणे मंजूर करून लागू करणे व इतर प्रलंबित मागण्यासाठी दि. २२ फेब्रुवारी २४ पासून आझाद मैदान मुंबई येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे व या आंदोलनाची दखल न घेतल्यास उपोषण ही करण्यात येईल. याबाबतचे निवेदन शासनास सादर करण्यात आले असून.शासनाने वेळेत दखल घेऊन कार्यवाही करावी अन्यथा हे आंदोलन अधिक तिव्र होऊ शकते. अशी माहिती महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना मुख्यालय लआतछर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

कष्टकरी हॉकर्स व भाजी विक्रेता युनियनच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी.

डोंबिवली / प्रतिनिधी :– कष्टकरी हॉकर्स व भाजी विक्रेता युनियन च्या वतीने कुळवाडी भूषण,बहूजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अनुकूल हॉटेल समोर डोंबिवली (पुर्व) येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली,शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष: मुन्ना हबीब खान यांच्या अध्यक्षतेखाली. शिवजयंती कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती गौतम गवई वंचित बहूजन आघाडी प्रणित कामगार आघाडी ठाणे जिल्हा अध्यक्ष,मार्गदर्शक : बबन कांबळे अध्यक्ष कष्टकरी हॉकर्स व भाजी विक्रेता युनियन,सुरेंद्र ठोके अध्यक्ष मा.वंचित बहूजन आघाडी डोंबिवली.एड. मिलिंद साळवे,अर्जुन केदार,अष्टपाल कांबळे,प्रशांत टेकुळे,विश्वविकास गायकवाड,अभिजित पवार,रवी इंगोले,राजू काकडे,अशोक गायकवाड,निलेश कांबळे,इतर बंधू भगिनी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE